दै. सामना दि. ०२/०२/२५

# चार जिल्ह्यांमधील पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

नांदेड : परिक्षेत्रातील अर्थात नांदेड, हिंगोली, परभणी आणि लातूर या चार जिल्ह्यांमधील पाच पोलीस निरीक्षक आणि ११ सहायक पोलीस निरीक्षकांच्या त्यांच्या विनंतीनुसार बदल्या करण्यात आल्या आहेत. आज पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी हे आदेश जारी केले आहेत.

परिक्षेत्राप्रमाणे त्या-त्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार परिक्षेत्रीय कार्यालयाला आहेत. त्यानुसार पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आज पाच पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या आहेत. त्यात नांदेड येथून दोन जात आहेत, आणि दोन येणार आहेत. बदल्या झालेले पोलीस निरीक्षक पुढीलप्रमाणे. अनंत ज्ञानदेव भंडे-नांदेड (लातूर), समाधान किशन चवरे-नांदेड (लातूर), संतोष बापूराव तांबे-हिंगोली (नांदेड), जगदीश शिवाजी मंडलवार-परभणी (नांदेड), प्रेमप्रकाश मारुतराव

**पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचे आदेश**

माकोडे-परभणी (हिंगोली) असे आहेत.

बदल्या झालेल्या ११ सहायक पोलीस निरीक्षकांमध्ये पाच नांदेडला येत आहेत आणि पाच नांदेड जिल्ह्याबाहेर जात आहेत. नांदेड येथून जाणारे पाच पोलीस निरीक्षक पुढीलप्रमाणे आहेत. सुधाकर विठ्ठलराव खजे-परभणी, दीपक साहेबराव मस्के-हिंगोली, बाळासाहेब मनोहर नरवटे-लातूर, बाळासाहेब विष्णू डोंगरे-लातूर, सुनील पांडुरंग गायकवाड-लातूर. नांदेड येथे येणारे पाच पोलीस निरीक्षक पुढीलप्रमाणे आहेत. रवि वैजनाथराव वाव्हुळे, श्रीमती अनुपमा दिलीपराव केंद्रे, शिवप्रसाद माधवराव कत्ते-लातूर, अनिल दत्ता काचमांडे, विशाल दीपक भोसले-हिंगोली. आणि परभणी येथील सहायक पोलीस निरीक्षक रसुल बशीरसाब तांबोळी यांना हिंगोली येथे पाठविण्यात आले आहे.

दै. गोदातीर

# नांदेड परिक्षेत्रांतर्गत पाच पीआय आणि ११ एपीआयच्या बदल्या; शहाजी उमाप यांनी काढले आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)**- नांदेड परिक्षेत्र नांदेड अंतर्गत विनंती व काहींची प्रशासकीय कारणावरून पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी परीक्षेत्रातील पाच पोलीस निरीक्षक आणि ११ सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या आहेत. त्यात संतोष तांबे आणि एपीआय रवी वाव्हुळे परत नांदेडला तर बाळासाहेब नरवटे यांना लातूरला पाठविण्यात आले आहे.

नांदेड परिक्षेत्र नांदेडअंतर्गत हिंगोली, लातूर, नांदेड आणि परभणी या चार जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र येते. लोकसभा आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणुकींच्या पार्श्व भूमीवर परिक्षेत्रांतर्गत काही पोलीस निरीक्षक आणि सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. निवडणुका संपल्यानंतर काही प्रशासकीय तर काही विनंतीवरून शहाजी उमाप यांनी शनिवारी




परिक्षेत्राअंतर्गत १६ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. त्यात पाच पोलीस निरीक्षक आणि ११ सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांचा समावेश आहे.

बदल्या झालेल्या पोलीस निरीक्षकांमध्ये संतोष तांबे हिंगोली ते नांदेड, जगदीश मंडलवार परभणी- नांदेड, अनंत भंडे नांदेड- लातूर, प्रेमप्रकाश माकोडे परभणी- हिंगोली, आणि समाधान चवरे नांदेड- लातूर यांचा समावेश आहे.

यासोबतच सहायक पोलीस निरीक्षकांमध्ये रवी वाव्हळे लातूर- नांदेड, विशाल भोसले हिंगोली- नांदेड, दीपक मस्के नांदेड- हिंगोली, बाळासाहेब नरवटे नांदेड- लातूर, बाळासाहेब डोंगरे नांदेड- लातूर, सुनील गायकवाड नांदेड- लातूर, अनुपमा केंद्रे लातूर- नांदेड, शिवप्रसाद कत्ते लातूर- नांदेड, अनिल काचमांडे हिंगोली- नांदेड, रसूल तांबोळी परभणी- हिंगोली आणि सुधाकर खजे नांदेड- परभणी यांचा बदल्यांमध्ये समावेश आहे.

जिल्ह्याच्या घटक प्रमुखांनी बदल्या झालेल्या सर्व अधिकाऱ्यांना तातडीने बदली झालेल्या ठिकाणी सोडावे व संबंधित अधिकाऱ्याने बदलीच्या ठिकाणी तत्काळ रुजू झाल्याचा अहवाल आपल्या वरिष्ठ कार्यालयाकडून पाठवावा असेही आदेशात नमूद केले आहे.